नि.फौ. ख. क्र. २८/२०२२.

नि. क्र. ६३.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** शांताराम पांडुरंग पाटील.

**वय** - ४० वर्ष, **व्यवसाय** - पोलीस पाटील,

**राहणार.-** शेळप, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

१. मी सन २०१२ पासून शेळप गावचा पोलिस पाटील म्हणून काम पाहत आहे. माझ्याकडे पारपोली व खेडगे गावाचा अतिरिक्त कार्यभार आहे. दि.०८.०६.२०२२ रोजी पोलिसांनी मला खेडगे गावात पंचनाम्यासाठी आरोपी क्र.३ च्या घरी बोलावले होते. तेथे पंचनामा करण्यासाठी फिर्यादी, दुसरा पंच, पोलिस कर्मचारी आणि मी हजर होतो.

२. पोलिसांनी आमच्या समक्ष तेथे पंचनामा केला होता. फिर्यादीने पोलिसांना माहिती दिली होती. आता मला पोलिसांनी आमच्या समक्ष केलेला घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावरती माझी व दुस–या पंचाची स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला नि. क्र. पी– ३० देण्यात आलेला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी क्र. १, २ व ४, ५ तर्फे उलटतपास – श्री. जी. जे. पाटील वकील.**

३. मी पोलिस पाटील असल्यामुळे वरचेवर पोलिस ठाण्यात जात असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिस ठाण्यात गेल्यानंतर ते काही कागदांवरती माझ्या स्वाक्ष–या घेत असतात. मी खेडगे गावातील सर्व लोकांना ओळखू शकत नाही. माझी पुर्वीपासून आरोपीं सोबत ओळख आहे. आरोपी क्र.३ पत्नी व मुलासह कायमस्वरुपी मुंबईत राहत असून सुट्टीसाठी गावी येत असतो.

४. मला तारडे मॅडमनी पंचनाम्यासाठी सकाळी ११.४५ वाजेच्या दरम्यान बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकूर माझ्या समक्ष लिहिण्यात आलेला नाही. मला सदर घराचा ग्रा. मि. क्रमांक सांगता येणार नाही. त्या घराच्या पुर्वेला रस्ता, पश्चिमेला परडे, उत्तरेला मारुती राणे आणि दक्षिणेला संजय राणे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावरती पोलिस ठाण्यात स्वाक्षरी केलेली असून आज खोटी साक्ष

देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**<u>आरोपी क्र. ३ तर्फे उलटतपास – श्री. जे. जी. दिडबाग वकील.</u>**

**५.** मी यापुर्वी पंच साक्षीदार म्हणून साक्ष दिलेली आहे. मी पोलिस ठाण्यात स्वाक्षरी करण्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांसाठी कायम पंच म्हणून काम करत असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी खोटया पंचनाम्यावरती पोलिस ठाण्यात स्वाक्ष–या केल्या आहेत.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १३.०२.२०२५.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते